सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या
नोंदणी बाबत..

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
जा. क्र. गृह/डी-३/सहकारी गृह. संस्था/नोंदणी/१४-सआ
दिनांक:- 23 मार्च, २०१६

संदर्भ:- या कार्यालयाचे क्र. गृह/डी-३/संस्था नोंदणी/२०१०, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजीचे परिपत्रक.

:: प रि प त्र क ::

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार गृहनिर्माण सहकारी संस्थांची नोंदणी केली जाते. सदर अधिनियमाच्या कलम ६ मधील तरतुदीनुसार निबंधक (सहकार आयुक्त) यांना नोंदणी निकषामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे किंवा सुधारणा करण्याचे अधिकार आहेत.

या कार्यालयाने संदर्भिय क्र. गृह/डी-३/संस्था नोंदणी/२०१०,दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या परिपत्रकान्वये भाडेकरु मालकीहक्क गृहनिर्माण संस्था, भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था (ओपन प्लॉट) व भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था (बिल्डर प्रवर्तित संस्था) यांच्या नोंदणीसाठी निकष निश्चित केले आहेत.

सदर परिपत्रकामध्ये बिल्डर प्रवर्तित सहकारी संस्थांची नोंदणी करण्यासाठी महापालिका किंवा तत्सम प्राधिकरणाकडून मंजूर आराखडयानुसार एकूण बांधल्या जाणाऱ्या अथवा बांधून पूर्ण झालेल्या सदनिकांच्या / गाळयांच्या ६० % इतके गाळेधारक नोंदणी प्रस्तावामध्ये सामील होणे आवश्यक राहील, अशी तरतुद आहे. ज्या इमारतीमध्ये मंजूर आराखडयानुसार एकूण बांधल्या जाणाऱ्या अथवा बांधुन पूर्ण झालेल्या सदनिकांच्या / गाळयांच्या ६० % इतके गाळेधारक नोंदणी प्रस्तावामध्ये सामील झाले नाही तर अशा इमारतीसाठी सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी होत नाही.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, बिल्डर प्रवर्तित सहकारी संस्थांची नोंदणी करताना ६० % गाळेधारक सामील होत नसल्याने इमारतीसाठी गृहनिर्माण सहकारी संस्थांची नोंदणी न झाल्यामुळे इमारतीची देखभाल व व्यवस्थापन होत नाही व त्यामुळे सभासदांची / प्रवर्तकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे बिल्डर प्रवर्तित सहकारी संस्थांच्या नोंदणीच्या निकषामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन होता.

https://mail-attachment.googleusercontent.com/attachment/u/0/?view=att&th=1600728b4... 11/29/2017

" भाडेकरु सहभागीदारी गृहनिर्माण संस्था (बिल्डर प्रवर्तित संस्था) नोंदणीसाठी महापालिका किंवा तत्सम प्राधिकरणाकडून मंजूर आराखडयानुसार एकूण बांधल्या जाणाऱ्या किंवा बांधून पूर्ण झालेल्या सदनिकांच्या / गाळयांच्या ६० % इतके गाळेधारक नोंदणी प्रस्तावात स्वाक्षरीसहीत सामील होणे आवश्यक राहील" या ऐवजी " **महापालिका किंवा तत्सम प्राधिकरणाकडून मंजूर आराखडयानुसार एकूण बांधल्या जाणाऱ्या किंवा बांधून पूर्ण झालेल्या सदनिकांच्या / गाळयांच्या ५१ % इतके गाळेधारक नोंदणी प्रस्तावात स्वाक्षरीसहीत सामील होणे आवश्यक राहील**" असा बदल करण्यात येत आहे. सोबतच्या परिशिष्टामध्ये देण्यात आलेल्या चेकलिस्टमध्ये तसा बदल करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त इतर दोन प्रकारच्या गृहनिर्माण संस्थांच्या नोंदणीसाठीच्या निकषामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सोबत – परिशिष्ट.

(चंद्रकांत दळवी)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
सदर परिपत्रकीय सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व नोंदणी अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणावे.
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), रायगड भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई.
३. सहनिबंधक, सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे), झो. पु. प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
५. उपनिबंधक, सहकारी संस्था (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
६. उपनिबंधक, सहकारी संस्था (एमएमआरडीए), बांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई.
७. मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.